ड

FORM-I A | N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला. प्र. वि., पहिली खबर क्र. FIR No.: ८० वर्ष Year: २०१८, दिनांक Date: २०/१२/२०१८

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections: ७ (अ)
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: गुरुवार, तारीख पासून Date from: २०/१२/२०१८, वेळ Time: १०:००, तारीख पर्यंत Date to: २०/१२/२०१८, वेळ Time: १८:२०

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date: २०/१२/२०१८, वेळ Time: १९:००

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ३८/२०१८, तारीख Date: २०/१२/२०१८, वेळ Time: १९:२०

4. माहितीचा प्रकार Type of Information : ..........., लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ..........., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ...........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठिकाणाचे नंबर No. if any ..........., गल्ली Ward: ताडदेव, मुंबई, रस्त्याचे नाव Name of road ...........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Distt. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: शिवबाबू मिश्रा ........ (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: रामअभिलाष मिश्रा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: ६४ वर्षे ........ (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय ........ फोन नं. Phone No. ...........
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation: टॅक्सी चालक
   (g) धर्म Religion: हिंदू ........, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्वे नं. Ward ........ घर / नाव नंबर House/Name No. ........ फोन /मो. नंबर Phone/M. No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road: (६/६९, १२(अ), धमार चाळ, रे. पी. मार्ग, फणसवाडी, ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn.: मुंबई - ०२
   तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   विजय वामनराव शेंडे उर्फ जतीन, वय ५० वर्षे, आर.टी.ओ. एजंट (खाजगी इसम) रा. ठी: कविनद मेन्शन, ४ था मजला, खोली नं २६, ग्रांट बाजार, ज्या मागे, एस के नाईक मार्ग, फोर्ट मुंबई-०१

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी शिवबाबू मिश्रा, वय ६८ वर्षे व्यवसाय - टॅक्सी चालक, यांची फिर्याद स्वतंत्र पानावर संगणीकृत करण्यात आली असून तिचा गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे ती सोबत जोडण्यात आलेली आहे.

समक्ष

शैलेंद्र चव्हाण
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई.

शिवबाबू मिश्रा

फिर्याद दिनांक २०/१२/२०१९

श्री. शिवबाबू रामअभिलाख मिश्रा, वय ६४ वर्षे, धंदा–टॅक्सी चालक, रा.ठि.– ८६/९२, १२अ, धुमाटा चाल, एस.पी. मार्ग, फणसवाडी, मुंबई. ४००००२

---

मी, वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर गेल्या ३५ वर्षापासून माझ्या कुटुंबियांसह रहात आहे. मी टॅक्सी चालक असुन गेली ४० वर्षापासुन टॅक्सी चालविण्याचा व्यवसाय करतो. माझे मालकीची टॅक्सी क्र. एम.एच. ०१ बीएम ४८७३ ही आहे. मी दिनांक ०८/०४/२०१९ रोजी माझ्या नमुद टॅक्सीचे फिटनेस सर्टिफीकेट नुतनिकरण करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, ताडदेव येथे अर्ज केला होता. त्यावर मला दिनांक ११/०४/२०१९ रोजीची अपॉईमेंट मिळाली व टॅक्सी टेस्टसाठी नेरूळ वंडर पार्क, सेक्टर १९, नवी मुंबई येथे घेवून येण्यास सांगितले. त्यावेळी मी आजारी असल्याने माझा मुलगा श्री. सत्यंद्र मिश्रा टेस्टसाठी माझी टॅक्सी नवी मुंबई येथे घेवून गेला होता. त्यावेळी आर.टी.ओ. ऑफीसरने माझी टॅक्सी टेस्टमध्ये पास केली होती. त्यानंतर माझे हार्टचे ऑपरेशन झाले व सप्टेंबर २०१९ मध्ये माझ्या आईचे निधन झाल्याने मी माझ्या मुळ गवी उत्तर प्रदेश येथे गेलो होतो. तोपर्यंत माझ्या टॅक्सीला फिटनेस सर्टिफीकेट मिळाले नव्हते.

त्यादरम्यान माझी टॅक्सी माझ्या ओळखीचे टॅक्सी ड्राईव्हर श्री. लालसाहेब मिश्रा हे चालवीत होते. दिनांक २२/११/२०१९ रोजी ग्रॅन्टरोड येथे सायंकाळी अंदाजे ०६.०० वाजता आर.टी.ओ. फलाईंग स्कॉडने श्री. लालसाहेब मिश्रा यांना माझी टॅक्सी चालवित असताना पकडले. सदरवेळी टॅक्सीचे फिटनेस सर्टिफीकेट नुतनिकरण केले नसल्याने तसेच पी.यु.सी. व इतर कागदपत्रे नसल्याने फ्लाईंग स्कॉड ने ड्राईव्हरचे ड्रायव्हींग लायसेन्स जप्त करून मेमो दिला.

मी गावावरून परत आल्यानंतर सदर बाब मला समजली. तेंव्हा मी दिनांक १२/१२/२०१९ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय ताडदेव येथे जावून क्लार्क कडे चौकशी केली असता त्यांनी मला तुमची कोर्ट केस बनविली असल्याचे सांगुन त्याकरीता उद्या येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दुसऱ्या दिवशी कार्यालयात जावून त्या क्लर्कची भेट घेतली. त्यावेळी त्याने मला माझ्या कोर्ट केस संदर्भातील कागदपत्रांची प्रत दिली. त्यावेळी मी खिडकी एफ ११ समोर उभा असताना विजय उर्फ जतीन (पुर्ण नांव माहित नाही) नावाचा एजंट मला येवून भेटला व त्यांने माझेकडील कोर्ट केस संदर्भातील कागदपत्रे पाहुन मी तुमची कोर्ट केस कॅन्सल करतो असे सांगुन, त्यासाठी पैसे द्यावे लागतील असे सांगितले व माझेकडील पेपर्सची झेरॉक्स काढुन घेतली. सदरवेळी मी एजंट जतीन यास फी भरण्यासाठी रूपये २०००/– अॅडव्हान्स म्हणुन दिले होते. त्यानंतर मी दिनांक १८/१२/२०१९ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय ताडदेव येथे जावून एजंट जतीन याची भेट घेतली. त्यावेळी त्याने मला कोर्ट केस कॅन्सल करण्यासाठी सरकारी दंड रूपये ७,२००/–, कोर्टाचे ४,५००/– आणि बाकी बेलसरे साहेब, कोर्ट कर्मचारी, क्लर्क तसेच स्वत: ला लाच म्हणुन देण्यासाठी असे मिळुन एकुण १७,०००/– रूपये द्यावे लागतील असे सांगुन उद्या पैसे घेवून या असे सांगितले.

परंतु मला एजंट विजय उर्फ जतीन याने शासकीय दंडाव्यतिरिक्त बेलसरे साहेब, कोर्ट कर्मचारी आणि क्लर्क यानां देण्यासाठी व स्वत:साठी मागणी केलले लाचेची रक्कम रूपये ५,३००/– देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १८/१२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे येऊन एजंट श्री. विजय उर्फ जतीन बेलसरे साहेब, कोर्ट कर्मचारी आणि क्लर्क यांचे विरुध्द पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांचेकडे यांना माझी तक्रार सांगितली त्यानंतर पो.नि.चव्हाण यांनी मला माझी तक्रार लेखी स्वरुपात लिहून देण्यास सांगितले. परंतु माझे हार्टचे ऑपरेशन झाल्याने मला व्यवस्थित लिहीता येत नसल्याने मी त्यांना विनंती केल्यावरुन पो.नि. चव्हाण यांनी माझी तक्रार

खरी नक्कल

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

दिनांक १९/१२/२०१९ रोजीची श्री. शिवबाबू मिश्रा यांची फिर्याद पुढे चालू...

हिंदीमध्ये टंकलिखीत करुन दिली. टंकलिखित केलेला तक्रारी अर्ज वाचुन पाहिल्यानंतर मी त्यावर सही केली. माझे तकार घेवून होईपर्यंत संध्याकाळाचे ०६.०० वाजले होते. त्यामुळे एजंट विजय उर्फ जतीन व लोकसेवकन भेटणार नसल्याने पो.नि. चव्हाण यांनी मला माझ्या तक्रारीची उद्या दिनांक १९/१२/२०१९ रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन दिनांक १९/१२/२०१९ रोजी सकाळी १०.०० वा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

त्यानुसार मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात पो.नि. चव्हाण यांचे समक्ष हजर झालो. पो.नि. चव्हाण यांनी माझ्या तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगून त्वरीत दोन शासकीय पंचांना पाचारण केले. दोन्ही पंच पो.नि. चव्हाण यांच्या कक्षात हजर झाल्यानंतर दोन्ही पंचांची पो.नि. चव्हाण यांनी माझ्याशी ओळख करून दिली. तसेच माझे देखील पंचांना ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी माझा तक्रार अर्ज पंचाना वाचावयास दिला. त्यांनी माझा तक्रर अर्ज वाचल्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे दोन्ही पंचानी त्यावर त्यांच्या सहया केल्या व माझा तक्रारअर्ज पो.नि. चव्हाण यांनी त्यांच्या ताब्यात घेतला. त्यानंतर लागलीच पो.नि. चव्हाण यानी मला व दोन्ही पंचाना घेवून पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षात आणले. तेथे पो.नि. चव्हाण यांनी तांत्रीक शाखेतुन एक डिजिटल व्हाईस रेकॉर्डर , एक मायक्रो एस.डी. कार्ड व दोन नवीन सेल घेवून आले. पो.नि. चव्हाण यांनी सदरचा डिजिटल व्हाईस रेकॉर्डर हा मला व पंचांना दाखविला तो आम्ही पाहीला असता सोनी कंपनीचा असल्याचे दिसुन आले. तसेच मायक्रो एस.डी. कार्डची पाहणी केली असता ते सॅनडिस्क कंपनीचे १६ जी बी चे कार्ड असल्याचे दिसुन आले. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून दाखविला व तेव्हा त्यामध्ये पूर्वीच्या कोणत्याही फाईल नसल्याचे दिसून आले .तसेच त्यामध्ये मायक्रो एस.डी. कार्ड टाकले त्यामध्ये देखील कोणतीही फाईल ध्दनीमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली.

त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी त्यांचे स्वत:चे माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पो.नि. चव्हाण व आम्ही सर्वजण त्यांच्या कक्षात आलो. सदरवेळी पो.नि. चव्हाण यांनी पडताळणी/सापळा पथकातील पोलीस कर्मचारी यांची माझी व पंचांची ओळख करून दिली. सदरवेळी पो.नि. चव्हाण यांनी पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी पडताळणी दरम्यान एजंट विजय उर्फ जतीन याने लोकसेवका करीता लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यास त्वरीत पुढील सापळा कारवाई करण्यासाठी लागणारी आवश्यक ती साधन सामुग्री घेण्याच्या सुचना पथकातील कर्मचाऱ्यांना दिल्या. तसेच लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यास वाहन चालक श्री. जामसंडेकर हे लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रासीन पावडर लावतील असे सांगुन वाहन चालक श्री. जामसंडेकर यांना अॅन्थ्रासीन पावडरचा डबा व अल्ट्रा व्हॉयलेट दिवा असलेली किटबॅग सोबत घेतील असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. चव्हाण दोन्ही पंच, पडताळणी/सापळा पथक व मी असे त्यांच्या कक्षातुन बाहेर पडुन कार्यालयाच्या आवरात आलो. तेथे आवारात उभे असलेले सरकारी वाहनामध्ये मी, पंच, पोनि चव्हाण, सपोआ चिंचकर व पोलीस पथक असे बसुन लाप्रवि कार्यालयातुन बाहेर पडलो. सदरचे वाहन सर पोचखानवाला रोड, वरळी नाका, लोटस मार्गे महालक्ष्मी रेसकोर्सच्या शेजारी असलेले वर्कशॉप अॅन्ड ट्रेनिंग फेलोशीप फॉर फिजिकल हॅन्डीकॅप या कार्यालयाच्या आवारात येवून तेथे थांबलो. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने मला व पंचांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी त्यांच्या ताब्यात असलेला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझ्या शर्टाच्या आतील बनियानला लावला व लागलीच मी व पंच श्री आंबेरकर यांचेसह एका भाडयाच्या टॅक्सीने प्रादेशिक परिवहन कार्यालय, ताडदेव येथे आलो. तेथे माझे कोर्टाचे

शिवबाबू मिश्रा

काम करणारा एजंट विजय उर्फ जतीन यास भेटलो. सदरवेळी मी माझ्या कोर्टाच्या कामासंदर्भात त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर एजंट विजय उर्फ जतीन याने मला माझ्या सरकारी कामाचे एकुण रूपये ११,७००/— व बेलसरे साहेब, कोर्ट कर्मचारी, क्लर्क यांना लाच म्हणुन देण्याकरीता व स्वत:साठी मिळुन रूपये ५,३००/— असे एकुण १७,०००/— रूपयांची मागणी केली. त्याप्रमाणे मी खाजगी एजंट विजय उर्फ जतीन यास सदरचे काम करण्यासाठी दिनांक १३/१२/२०१९ रोजी रूपये २०००/— ॲडव्हान्स म्हणुन दिले होते. व उर्वरीत १५,०००/— रूपयाची रक्कम घेवून येण्यासाठी त्याच्याकडे वेळ मागीतला. त्याप्रमाणे त्याने मला अर्ध्या तासात पैसे घेवून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे लागलीच मी व माझे सोबत असलेले पंच असे टॅक्सीने पोलीस वाहनाजवळ परत आलो. तेथे पो.नि. चव्हाण यांनी मला लावलेला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन तो बंद केला. त्यानंतर त्यांनी मला व पंचास झालेल्या पडताळणीबाबत माहिती विचारली असता मी वरिलप्रमाणे हकिकत सांगितली. व पच श्री. आंबेरकर यांना देखील पडताळणी बाबत विचारले असता, त्यांनी माझे प्रमाणे हकीगत सांगितली. त्यानंतर पो.नि. चव्हाण व पंचांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले माझे व एजंटचे संभाषण एकले. त्यामध्ये एजंट विजय उर्फ जतीन यांने माझे काम करण्यासाठी अधिकारी बेलसरे व इतर कर्मचारी यांचेकरीता लाच म्हणुन देण्यासाठी व स्वत:साठी मिळुन माझेकडे रूपये ५,३००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व कारवाई पोलीस वाहनातच करण्यात आली. मी खाजगी एजंट यांस माझ्या कामाची सरकारी रक्कम रूपये ११,७००/— व बेलसरे साहेब, इतर कर्मचारी व त्याचे स्वत:साठी लाच म्हणुन दयावयाचे रूपये ५,३००/— अशी एकुण रक्कम रूपये १७,०००/— पैकी रूपये २०००/— ॲडव्हान्स म्हणुन दिले होते. उर्वरीत १५,०००/— रूपये (रूपये ५००/— दराच्या ३० भारतीय चलनी नोटा) पो.नि. चव्हाण यांच्या ताब्यात दिली. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी पथकातील एका कर्मचाऱ्याकडुन नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले व पो.नि. चव्हाण यांच्या सुचनेनुसार पोलीस वाहनाचे चालक श्री. जामसंडेकर यांनी मला व पंचाना ॲन्थ्रॅसीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. त्यानंतर श्री. जामसंडेकर यांनी मी दिलेल्या रु. ५००/— दराच्या एकुण ३० चलनी नोटांना पोलीस वाहनामध्येच ॲन्थ्रॉसीन पावडर लावली आणि त्या नोटा माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशात अलगद ठेवल्या.

पो.नि. चव्हाण यांनी मला सुचना दिल्या की, एजंटने सरकारी कामाचे व लाचेची मागणी केल्यांनतरच मी माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशातील रक्कम उजव्या हाताने काढून एजंट दयावी. तसेच लाचेची रक्कम स्वीकारल्यानंतर माझा डावा हात डोक्यावरुन वारंवार फिरवून पूर्व नियोजित इशारा सापळा पथकास दयाव असे सांगितले. त्यानंतर पोनि चव्हाण यांनी पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्या शर्टाच्या आत बनियनला लावला नंतर मी, पंच खाजगी टॅक्सीने आर.टी.ओ. ताडदेव व इतर सापळा पथकासह शासकिय वाहनाने प्रादेशिक परिवहन कार्यालय ताडदेव येथे आले. त्यानंतर मी व माझे सोबत असलेले पंच श्री. आंबेरकर एजंट विजय उर्फ जतीन यांचा शोध घेवून त्यांना भेटलो. ते भेटल्यानंतर त्यांनी माझ्याकडे पडताळणीत मागणी केल्याप्रमाणे रक्कमेची मागणी केली. तेंव्हा मी माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली रक्कम उजव्या हाताने काढुन एजंट विजय उर्फ जतीन यांचे समोर धरली असता त्यांनी सदरची रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. एजंट वियज उर्फ जतीन यानी रक्कम स्विकारल्यानंतर मी पुर्वनियोजित इशारा म्हणून माझा डाव्या हात डोक्यावरून सतत फिरवून लाच स्विकारल्याचा इशारा सापळा पथकास दिला असता जवळचं असलेल्या सापळा पथकातील अंमलदारानी एजंट विजय उर्फ जतीन यांचे दोन्ही हात पकडुन त्यास अटकाव केला. त्यानंतर पो.नि.चव्हाण हे तेथे आले व त्यांनी माझे

खरी नक्कल

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

दिनांक १९/१२/२०१९ रोजीची श्री. शिवबाबू मिश्रा यांची फिर्याद पुढे चालू...

बनियनला लावलेला व्हाईस रेकॉडर बंद केला व व एजंट वियज उर्फ जतीन यास स्वत:ची ओळख सांगितली. पो. नि. चव्हाण यानी एजंट विजय उर्फ जतीन याचे कडे श्री. बेलसरे साहेबाबाबत चौकशी केली असता ते त्याचे कार्यालात उपस्थित असतील असे सांगितले. त्यानंतर एजंट विजय उर्फ . जतीन याचे सह आम्ही सर्वजण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात पोलीस वाहनाने आलो. गोपनिय पहिल्या माळयावरील हॉलमध्ये माझे व एजंट विजय उर्फ जतीन यांचे हात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले.

त्यानंतर पो.नि.चव्हाण यांचे सुचनेनुसार पुढील सापळा कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी कार्यालयालत करण्यात आली व सदर ठिकाणी सविस्तर पंचनामा करण्यात आला.

आरोपी खाजगी एजंट विजय वामनराव शेंडे यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या—घेण्याचे व्यवहार नाहीत. तसेच नमूद आरोपीस देण्याकरीता आणलेली सरकारी दंडाची व लाचेची रक्कम ही मी माझे वैयक्तीक बचतीतुन आणलेली आहे.

तरी आरोपी खाजगी एजंट विजय वामनराव शेंडे उर्फ जतीन यांनी माझे कोर्टातील केसचे काम कोर्टात न जाता लोकसेवक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्री. बेलसरे यांच्या कार्यालयातच करून देण्यास प्रवृत्त करून त्या मोबदल्यात त्यांना व स्वत:साठी गैरवाजवी फायदा म्हणून सरकारी दंडा व्यतिरिक्त रू ५,३००/— इतक्या लाचेची मागणी स्वत:साठी व लोकसेवक बेलसरे साहेब यांचेसाठी दि. १९/१२/१९ रोजी स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद असुन त्यांच्यावर कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकीकृत करुन ती मला हिंदीतुन समजावुन सांगितली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

(शैलेंद्र चव्हाण)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

शिवबाबू मिश्रा

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..............................
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
..............................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..............................
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..............................
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

खालील नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी विजय शेंडे उर्फ जतीन यांनी फिर्यादी यांचे कोर्टातील केसचे काम कोर्टात न जाता लोकसेवक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. बेलदरे यांच्या कार्यालयातच करुन देण्याचे प्रवृत्त त्या मोबदल्यात त्यांना व स्वतःसाठी गैरवाजवी फायदा म्हणून लाचेची रु २१०००/- त्यापैकी रु ५३००/- इतक्या लाचेची मागणी स्वतःसाठी व लोकसेवक बेलदरे यांच्यासाठी करुन रु १५०००/- लाचेची रक्कम स्विकारली म्हणून कलम ७ अ, भ्र. प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

शैलेंद्र चव्हाण पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..............................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .............., जिल्हा .............., राज्य ..............,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .................. Rank.................. No. ..............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .............................. (3) Transferred to P.S ..............................,
District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांची सही
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name शैलेंद्र शिवराम चव्हाण
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला. प्र. वि. मुंबई.
Posting
Code No. of I.O. ..............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..............................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report